## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ )

जा.क्र. ८१२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/१२/२०१६

**१) चारचाकी गाडी चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यु. :–**

दिनांक ०९/१२/२०१६ रोजी १९.२० वा. दर. यातील फिर्यादीचा लहान भाऊ मृतक महादेव संपत बोरकर वय ४५ वर्ष, रा. तलाव वार्ड साकोली हा श्रीराम सहकारी भात गिरनी मर्यादीत साकोली येथुन धान पिसाई न झाल्याने उडान पुलीया एनएच०६ रोड वरुन पायी येत असतांना भंडारा कडुन देवरी कडे जाणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीच्या भावाला धडक मारुन त्याचे मारणास कारनीभुत झाल्याने फिर्यादी रामु संपत बोरकर वय ६० वर्ष, रा. शिवाजी वार्ड साकोली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ)भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. वानखेडे पोस्टे साकोली हे करीत आहेत.

**२) अज्ञात मोटार सायकलच्या धडकेत एकाचा मृत्यु. :–**

दिनांक २९/११/२०१६ रोजी २०.३० वा. दर. यातील मृतक मनोज भाऊराव राऊत वय ३७ वर्ष, रा. पेट्रोल पंप ठाणा जवाहरनगर हा आपल्या मोटार सायकलने मुजबी वरुन एनएच ०६ रोड नी शाहापुर येथे येत असता फुलमोगरा गावाजवळ एनएच ०६ रोडवर यातील अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतकचे मोटार सायकलला मागेहुन धडक देवुन गंभिर जखमी केल्याने त्यास उपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावुन मृतकाचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला टपाला व्दारे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भांदवि. सहकलम १३४ अ. ब. मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आळे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलगा घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०६/१२/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. ते आज पावेतो यातील फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा केशव भोजराज उके वय १६ वर्ष, रा. खुर्शीपार हा शाळेत जात नसल्याने फिर्यादीने मुलास शाळेत का जात नाही तुला काय कमी पडते सांग तु काय करत आहेस असे बोलुन शेतावर निघुन गेला व शेतावरुन परत आला असता मुलगा घरी दिसुन आला नाही शोधाशोध केला असता मिळुन न आल्याने त्याला कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले असावे अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन व परीपत्रक क्र. सि. आर. टी. ओ. ११२ प्र. क./१४ पो. ल. –१३ गृहविभाग मुंबई दि. ०१/११/२०१४ अन्वये पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शेख पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**४) वरठी पोलीस यांची कारवाई . :–**

दिनांक १०/१२/२०१६ वा. ११.५० वा. दर. यातील आरोपीचे घराची घरझडती घेतली असता घरझडती २८ नग कागदाचे लहान पुडीत ब्राऊन शुगर/गर्द २ ग्रॅम १६० मिली ग्रॅम कि. २१६०/–रु. व हिरव्या रंगाचा ६६/६० मिली ग्रॅम गांजा कि. ५०/–रु. असा एकुण २२१०/–रु. चा माल मिळुन आल्याने पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ८(क)२०,२२ एन.डी.पी.एस.अ‍ॅक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. कारंडे पोस्टे वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) दारूडया वाहन चालकावर कारवाई. :–**

दिनांक १०/१२/०१६ चे २१.०० वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत कारधा येथे पो.स्टे.चे आवारात चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. संतापे पो.स्टे. कारधा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कारधा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. आगासे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**६) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक १०/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. वरठी, तुमसर व पवनी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारू कि. १,८००/–रू तसेच ५४० मिली देशी दारु कि. १५०/–रू असा एकुण कि. १,९५० / –रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(के.एम.हत्तीमारे)
सहा. पोलीस निरीक्षक
जि.वि.शा भंडारा
दुरध्वनी.क्र. ९४२२८३२१७८

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.